संदीप खोपडे, धनकवडी, पुणे.

☐ **सर्वात प्रथम खलनायकाची भूमिका कोणी केली?**

— *राजा हरिश्चंद्र* या पहिल्या भारतीय चित्रपटात विश्वामित्राची भूमिका करणाऱ्या गजानन वासुदेव साने यांनी.

☐ **शबाना आझमी-गिरीश कर्नाड यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?**

— *निशांत, स्वामी, शमा.*

☐ **हिंदी चित्रपटात सर्वात प्रथम विवाहदृश्य कोणत्या चित्रपटात दिसले?**

— १९२०च्या *सीता स्वयंवर* या मुकपटात.

नरेश कोळी, रायगड.

☐ **कोणकोणते अभिनेते पहिल्याच चित्रपटात हिट झाले?**

— चंद्रमोहन(*अमृतमंथन*), जितेंद्र(*गीत गाया पत्थरोने*), ऋषी कपूर(*बॉबी*), संजय दत्त(*रॉकी*), सनी देओल(*बेताब*), विश्वजीत(*बीस साल बाद*), आमीर खान(*कयामत से कयामत तक*).

दादा कालेकर, मुंबई.

☐ **'अम्मा रोटी दे दे बाबा रोटी दे दे...' हे गाणं *संसार* या चित्रपटातलं आहे का? त्याचे गीतकार, संगीतकार आणि कलाकार कोण? संसार नावाचे आणखी किती चित्रपट आले? त्यांचे गीतकार-संगीतकार आणि कलाकार कोण?**

— १९५१च्या जेमिनीच्या *संसार*मध्ये हे गाणं होतं. पं. इंद्र या *संसार*चे गीतकार होते. संगीतकार पार्थ सारथी, शंकर शास्त्री व कल्ला. कलाकारः पुष्पवल्ली, एम. के. राधा, बनजा, स्वराज्य, गुलाब, मोहना, आगा, मीरा, डेव्हीड जे. एस. कश्यप, अनिलकुमार, ईश्वरलाल, कल्ला, रत्नाप्पा, १९५१च्या जेमिनीच्या या *संसार* शिवाय *संसार* नावचे आणखी दोन चित्रपट आले. १९७१ व १९८७ला. १९७१च्या *संसार*चे संगीतकार होते चित्रगुप्त. कलाकार नवीन निश्चल, अनुपमा, निरुपा रॉय, मीना टी., जयश्री टी., अभी भट्टाचार्य, असित सेन, १९८७च्या *संसार*चे संगीतकार होते लक्ष्मीकांत-प्यारेलाल. १९५१च्या *संसार*ची नायिका होती पुष्पवल्ली. १९८७च्या *संसार*मध्ये पुष्पवल्लीची कन्या रेखा नायिका होती. राज बब्बर, अनुपम खेर, अजिंक्य देव, अर्चना जोगळेकर, अरुणा ईराणी, शफी इनामदार या *संसार*चे अन्य कलाकार होते.


अ. वा. कोर्टीकर, पंढरपूर.

☐ **उषाकिरण यांचे हिंदी चित्रपट कोणते? नायक कोण? कोणत्या नायकाबरोबर त्यांची जोडी सर्वाधिक गाजली?**

— *गौना*(अनुपकुमार), *राजरानी*(सोहन कपिला), *श्रीकृष्ण दर्शन*(सहभूमिका), *महालक्ष्मी*(सहभूमिका), *लालकुंवर*(जयराज), *माया मच्छिंद्र*(सहभूमिका), *श्रीविष्णू भगवान*(सहभूमिका), *दाग* (जवाहर कौल), *राजरानी दमयंती*(सहभूमिका), *सरकार* (सहभूमिका), *नवदुर्गा* (महिपाल), *धून* (एम. राजन), *हुस्न का चोर*(सहभूमिका), *पतिता*(देव आनंद), *बादबान*(देव आनंद), *अधिकार*(किशोरकुमार), *औलाद*(अरुण-गोविंदाचे वडील), *दोस्त* (सुरेश), *समाज* (अनुपकुमार), *शोभा*(अभी भट्टाचार्य), *बहू*(करण दिवाण), *उटपटांग* (आगा), *अयोध्यापती*(अभी भट्टाचार्य), *आनवान* (महिपाल), *अनुराग* (मुकेश), *आवाज* (झुल वेलानी), *ढोलामारू* (प्रदीपकुमार), *धोबी डॉक्टर* (किशोरकुमार), *गुरु घंटाल* (मोतीलाल), *परिवार*(जयराज), *दुश्मन*(देव आनंद), *जीवनसाथी*(अनुपकुमार), *मुसाफिर* (दिलीपकुमार), राजा विक्रम(शाहू मोडक), *अमृत मंथन*(मनहर देसाई), *काबुलीवाला* (सज्जन), *तन्हाई*(करण दीवाण), *गेहरा दाग* (सहभूमिका), *मिली* (सहभूमिका) या हिंदी चित्रपटात उषाकिरणनी भूमिका केल्या. हिंदीत कोणत्याही नटाबरोबर त्यांची जोडी तशी गाजली नाही. मराठीत सूर्यकांतबरोबर त्यांची जोडी गाजली.

मुग्धा फडणीस, चिपळूण.

☐ **अभिनेत्री जूही चावलाला आत्तापर्यंत कोणकोणते पुरस्कार मिळाले आहेत? तिने बालकलाकार म्हणून काम केलंय का?**



हम है राही प्यार केमध्ये आमीर खान आणि बालकलाकारांसह जूही चावला

— *हम है राही प्यार के*साठी जूहीला सर्वश्रेष्ठ अभिनेत्रीचे फिल्मफेअर पारितोषिक मिळालं होतं. जूही कधीही बालतारका नव्हती. *सल्तनत*मध्ये ती तरुण भूमिकेतच सर्वात प्रथम चित्रपटात आली.

☐ **सुलोचना म्हणजे रूबी मायर्स का? त्यांनी कोणकोणत्या मराठी चित्रपटात नायिकेची भूमिका केलीय?**

— मूकपट जमान्यात एक सुलोचना चित्रपटात होती. ती जन्माने अँग्लो इंडियन होती. रुबी मायर्स तिचं खरं नाव होतं आणि सुलोचना हे नाव तिने चित्रपटासाठी घेतलं होतं. मराठी चित्रपटातल्या सुलोचनाबाईंचं खरं नाव रंगू. त्यांनी *जयभवानी, जीवाचा सखा, मानाचं पान, मीठ-भाकर, मोठी माणसं, देव पावला, जोहार मायबाप, नवराबायको, गावगुंड, पारिजातक, पाटलाचा पोर, शिवा रामोशी, चिमणी पाखरं, घरधनी, जीवाची मुंबई, नरवीर तानाजी, प्रतापगड, मूक लेकरू, माझी जमीन, वहिनीच्या बांगड्या, वादळ, महाराणी येसूबाई, महात्मा फुले, ओवाळणी, पुरुषांची जात, तारका, भाऊबीज, मी तुळस तुझ्या अंगणी, पुनवेची रात, जगावेगळी गोष्ट, माझं घर माझी माणसं, पावनखिंड, पायदळी पडलेली फुलं, आहेर, धाकटी जाऊ, सुखाचे सोबती, आकाशगंगा, पतिव्रता, भाव तेथे देव, सांगत्ये ऐका, प्रपंच, भिंतीला कान असतात, विठू माझा लेकुरवाला, छोटा जवान, फकिरा, मोलकरीण, तू सुखी रहा, मराठा तितुका मेळवावा, संत निवृत्ती ज्ञानदेव, तुका झालासे कळस, लक्ष्मी आली घरा, रायगडचा राजबंदी, साधी माणसं, तूच माझी वहिनी, पाठचा भाऊ, संत गोरा कुंभार, सुखी संसार, अन्नपूर्णा, एकटी, खंडोबाची आण, मानाचा मुजरा, मायमाऊली, पुढारी, वऱ्हाडी आणि वाजंत्री, घरगंगेच्या काठी, ईर्षा, मामा भाचे, सावली प्रेमाची* या मराठी चित्रपटात सुलोचनाबाईंनी नायिकेची भूमिका केली.